(असाधारण)

बुधवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२

अधिसूचना

क्रमांक : १९२/२०२२ दिनांक : ३०.११.२०२२

विषय :- २०२३-२४ या शैक्षणिक सत्राचे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून संलग्नीकरण अर्ज Google Form च्या माध्यमातून (Online) भरण्याबाबतच्या अंतिम तिथीबाबत..

संदर्भ : १.विद्यापीठ निदेश क्र.८२/२०२२, दि.१३.१०.२०२२
२.विद्यापीठ अधिसूचना १८८/२०२२, दि.१७.११.२०२२

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भांकीत निदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ मधील कलम ३७(१)(ट) प्रमाणे विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करण्याबाबतची तरतूद आहे. सदर तरतुदीस अनुसरुन अधिष्ठाता मंडळाने विद्याविषयक लेखापरिक्षण मानके व कार्यप्रणाली तयार केली असून, विद्यापीठाच्या प्राधिकारीणीने त्याला मान्यता प्रदान केली आहे व त्याअनुषंगाने निदेश क्र.८२/२०२२, दि. १३.१०.२०२२ निर्गमित करण्यात आला आहे.

आणि

ज्या अर्थी, ज्या महाविद्यालयाचे विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखेचे संलग्निकरण संपलेले आहे. अशा महाविद्यालयांनी सत्र २०२३-२४ पासून विद्याविषयक लेखा परीक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयाचे संलग्निकरण करावयाचे आहे. त्याअर्थी, संबंधीत पात्र महाविद्यालयांनी संलग्नीकरण अर्ज Google Form च्या माध्यमातून (Online) भरण्याची अंतिम तिथी ३०.११.२०२२ पर्यंत अधिसूचित करण्यात आली होती.

आणि

ज्या अर्थी, संलग्नित महाविद्यालयाच्या अडचणी लक्षात घेता, Google Form च्या माध्यमातून संबंधीत पात्र महाविद्यालयांनी संलग्निकरण अर्ज (Online) भरण्याची **अंतिम तिथी १० डिसेंबर, २०२२** पर्यंत राहील.

आणि

ज्या अर्थी, ज्या महाविद्यालयांना कायम संलग्निकरण प्रदान करण्यात आलेले आहे अशा महाविद्यालयांना संलग्निकरण अर्ज (Online) भरण्याची आवश्यकता नाही फक्त संलग्निकरण शुल्क निदेश क्र.१९/२०२२, दि.१०.०३.२०२२ नुसार भरण्यात यावे तथापि, ज्या विषय/अभ्यासक्रमांना कायम संलग्निकरण देण्यात आलेले नाही अशा विषय/अभ्यासक्रमाकरीता सदर संलग्निकरण अर्ज (Online) भरावयाचा आहे.

संलग्निकरण अर्ज Google Form च्या माध्यमातून (Online) भरण्यास खालील पध्दतीचा वापर करण्यात यावा.

१. अर्ज (Online) भरण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा किंवा QR कोड स्कॅन करावा.
   अ. लिंक https://forms.gle/9EYFaYRt1q1S1bsV7
   ब. QR कोड

२. अर्जासह प्रदान केलेल्या लिंकवरुन मॅन्युअल, शैक्षणिक ऑडिटसाठी प्रोफॉर्मा आणि इतर संबंधित दस्तऐवजांमध्ये प्रवेश करा.
३. सर्व फील्ड भरणे अनिवार्य आहेत. या फॉर्ममध्ये आवश्यकतेनुसार प्रत्येक तपशील भरावे.
४. **आवश्यकतेनुसार सर्व तपशील भरल्यानंतर सर्व आवश्यक तपशीलांसह प्रिंट काढून संलग्नतेसाठी भरलेल्या नवीन पावतीसह शैक्षणिक ऑडीटसाठी प्रोफॉर्मा अपलोड करावा तसेच सदर अर्जाची हार्ड कॉपी विद्यापीठात सादर करावी.**
५. महाविद्यालयाने जास्तीत जास्त पाच फाईल Doc/Excel/PDF फॉरमेंटमध्ये फक्त 100 MB आकारपर्यंत अपलोड करु शकता तसेच इतर फॉरमेटमधील फाईल्स स्वीकारल्या जाणार नाहीत.
६. प्रत्येक महाविद्यालयाने आवश्यक फाईल्स अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर फाईल्स अपलोड केल्याशिवाय तुमचा शैक्षणिक ऑडीसाठीचा अर्ज अपूर्ण मानला जाईल.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.